**नि.फौ.प्र.क्र.५३४/२०२१**
सरकार वि. श्रध्दा
**नि. क्र.३६**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.६ यांची शपथेवर सरतपासणी सुरु</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | शकील अंसारी बब्बु अंसारी |
| वय | : | ३४ वर्षे |
| व्यवसाय | : | किराना दुकान, |
| राहणार | : | मोमिनपुरा, नागपूर. |

**<u>सरतपासणी– सरकार तर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती संगीता गोगे यांच्याकडून</u>**

१. मला प्रकरणात समंस मिळाले व मी आज या प्रकरणात साक्ष देण्यास हजर झालो. सदरील घटना अंदाजे ४ ते ५ वर्षांपुर्वी घडली होती. जुबेरभाई माझेकडे आले होते व ऑटोमध्ये दोन व्यक्ती बसलेले होते. ऑटोत बसलेल्या एका मुलीने असे सांगीतले की, त्यांचे भावाला कॅन्सर आहे, व त्यामुळे तिचे जवळील दागीने गहाण ठेवून तिला रक्कम देण्याबाबत जुबेर यांनी मला सांगीतले. मी दागीणे घेवून त्या मुलीला रक्कम रुपये २०,०००/– दिले. त्यानंतर मी माझे दुकानामध्ये गेलो. त्यानंतर ७–८ दिवसांनी पोलीसांनी मला पोलीस स्टेशनला बोलविले होते. तेथे पोलीसांनी मला विचारणा केली असता मी त्यांना सदरील दागीने बाबत माहिती दिली. पोलीसांनी मला ते दागीणे चोरीचे असल्याबाबत सांगीतले.

**<u>उलटतपासणी – श्री. एस.एम.माटे वकील आरोपी करीता</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, मी जुबेरसह आलेल्या महिलेला व इतर व्यक्तीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वर नमुद केल्याप्रमाणे कोणतिही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जुबेर यांचे सांगण्यावरुन खोटी साक्ष

देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला पोलीसांनी कधी बोलविले नाही व माझा जबाब घेतला नाही.

**फेरतपास – काही नाही**.

**श्रवणोत्तर स्वीकृत**

**माझे समक्ष,**

स्वा/-

दिनांकः- ०८.१०.२०२५

(एस. एस. बोस )
मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर